मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचेसमोरील
माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-५-१९-(३) अंतर्गत अपील

अपील क्रमांक- २४७६/२००७

९९५८

(१)- श्री ललित मूलचंद वेदमुथा,
चैतन्यवाडी, बुलडाणा

विरुध्द

(२)- प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
पाटबंधारे विभाग, बुलडाणा

(३)- जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
पाटबंधारे विभाग, बुलडाणा

(आदेश पारित दिनांक २७ जानेवारी, २००९)

**निर्णय**

अर्जदार अपीलकर्ता श्री ललित मूलचंद वेदमुथा, यांनी या खंडपीठाकडे, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत प्रस्तुत द्वितीय अपील-अर्ज दाखल केलेला असून, सदर अपिलाचेबाबतीत आज दिनांक २७ जानेवारी, २००९ रोजी सुनावणी घेण्यात आली असता, अर्जदार अपीलकर्ता श्री ललित मूलचंद वेदमुथा हे हजर आहेत आणि जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री पराते तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता हे हजर आहेत आणि सुनावणीदरम्यान उभय पक्षांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सदरील द्वितीय अपीलाचेबाबतीतील सुनावणीदरम्यान असे निदर्शनास आले आहे की, अर्जदार अपीलकर्ता श्री ललित मूलचंद वेदमुथा, यांनी विषयांकित अधिनियमान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यास्तव जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग यांचेकडे दिनांक १६ एप्रिल, २००७ रोजी अर्ज दाखल केलेला होता. तथापि, त्यांना मागणीप्रमाणेची आवश्यक ती माहिती उपलब्ध न झाल्याकारणाने, अर्जदार अपीलकर्ता यांनी अधिनियम-२००५ चे कलम-१९-(१) चे तरतूदीनुसार प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते.

प्रस्तुत द्वितीय अपीलाचेबाबतीतील सुनावणीदरम्यान संबंधित जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, अर्जदार अपीलकर्ता श्री वेदमुथा यांनी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे दिनांक १२ मे, २००७ रोजी असे लेखी निवेदन दिलेले आहे की, त्यांनी दिनांक १६ एप्रिल, २००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या अंतर्गत माहिती मागितलेली होती.

परंतु त्यांना सदरील माहितीची आता आवश्यकता नाही, म्हणून त्यांनी दिलेला सदरीलबाबतीतील अर्ज रद्द समजावा व त्यांना माहिती देण्यात येऊ नये. सदरील बाबीस अर्जदार अपीलकर्ता यांनी सुनावणीदरम्यान दुजोरा दिलेला आहे. असे असले तरी, यानंतर अर्जदार अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता असल्यास, त्यांना तत्संबंधी संबंधितांकडे विषयांकित अधिनियमांतर्गत स्वतंत्र वेगळा अर्ज दाखल करता येईल व आवश्यक त्या माहितीची मागणी करता येईल.

वरील सर्व बाबींचा तपशीलवारपणे विचार करण्यात येऊन, प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( भास्कर पाटील ),
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
अमरावती खंडपीठ, अमरावती

[illegible] आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे-समोरील
माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत अपील-

अपील क्रमांक- २४७७/२००७

जा.क्र. 403

(१)- अर्जदार तथा अपीलकर्ता
श्री ललित मूलचंद वेदमुथा,
चैतन्यवाडी, बुलडाणा

(२)- प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
पाटबंधारे मंडळ, बुलडाणा

(३)- जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
पाटबंधारे विभाग, बुलडाणा

(आदेश पारित दिनांक- २७ जानेवारी, २००९)

**निर्णय**

अर्जदार तथा अपीलकर्ता श्री ललित मूलचंद वेदमुथा, यांनी या खंडपीठाकडे, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत प्रस्तुत द्वितीय अपील-अर्ज दाखल केलेला असून, सदर अपिलाचेबाबतीत आज दिनांक २७ जानेवारी, ०९ रोजी सुनावणी घेण्यात आली असता, अर्जदार अपीलकर्ता श्री ललित मूलचंद वेदमुथा, हे हजर आहेत तसेच उत्तरवादी म्हणून जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग बुलडाणा याचेतर्फे श्री पराते हजर आहेत तसेच, प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, बुलडाणा हजर आहेत आणि सुनावणीदरम्यान उभय पक्षांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

प्रस्तुत द्वितीय अपीलाचे सुनावणीदरम्यान असे निदर्शनास आले आहे की, अर्जदार तथा अपीलकर्ता श्री ललित मूलचंद वेदमुथा, यांचे म्हणण्यानुसार, त्यांनी उपरोक्त अधिनियमान्वये, दिनांक ४ डिसेंबर, २००० ते ३१ मार्च, २००४ या चार वर्षांचे कालावधीतील आवश्यक त्या दस्तऐवजासाठी, जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, बुलडाणा यांचेकडे मुद्दा क्रमांक- १ ते ६ प्रमाणेची माहिती ही वाहनांचे सुटे भाग व त्याबाबतीतील दुरुस्ती याप्रमाणे अर्ज करुन मागितलेली असून, त्यांनी सदरीलबाबतीतील आवश्यक असलेली माहिती तथा दस्तऐवज त्यांना मिळालेला नाही. तर कांही प्रमाणातील देण्यात आलेला दस्तऐवज हा वाचनीय नसल्याने, त्याचा कांही उपयोग नसल्याचे त्यांनी सांगितले.

तथापि, सुनावणीदरम्यान जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचे म्हणण्यानुसार, अर्जदार तथा अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपातील केलेली असल्याने, याबाबतीतील कालावधी पहाता, तो अभिलेख मोठ्या प्रमाणावरील असल्याचे सांगितले. यावर उभय पक्षांना असे निर्देशित करण्यात आले आहे की, अर्जदार तथा अपीलकर्ता श्री ललित मूलचंद वेदमुथा यांना, जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, यांनी त्यांचे कार्यालयातील उपलब्ध दस्तऐवजाचे निरीक्षणास्तव कार्यालयीन कामाचे दिवशी व वेळेत समक्ष बोलावून, अर्जदार तथा अपीलकर्ता यांनी सदरील उपलब्ध दस्तऐवजाचे निरीक्षण करावे व त्यानुसार आवश्यक तो दस्तऐवज माहिती ही त्याबाबतीतील येणाऱ्या शुल्काचा भरणा करुन, कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी. याबाबतीत उभय पक्षांनी तयारी दर्शविलेली असून, त्याप्रमाणेची कार्यवाही जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग यांनी एक महिन्याचे कालावधीत पूर्ण करुन, अर्जदार तथा अपीलकर्ता यांना मागणीप्रमाणेची आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचेबाबतीतील अहवाल या आयोगास त्वरित सादर करावा.

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे-समोरील
माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत अपील-

अपील क्रमांक- २७३६/२००७

(१)- श्री पुंडलिक जानकिराम काळे,
मु.पो.- मरसूळ (सोपिनाथ), ता.- पातूर,
जिल्हा- अकोला

आ.क्र.१००

**वि रु ध्द**

(२)- प्रथम अपीलीय अधिकारी तथा
रजिस्ट्रार जनरल, उच्च न्यायालय,
मुंबई

(३)- जनमाहिती अधिकारी तथा
उच्चन्यायालय खंडपीठ नागपूर

(आदेश पारित दिनांक १७ जानेवारी, २००९)

**निर्णय**

अपीलकर्ता श्री पुंडलिक जानकिराम काळे यांनी या खंडपीठाकडे माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत अपील-अर्ज दाखल केलेला असून, सदर अपिलाचेबाबतीत आज दिनांक १७ जानेवारी, ०९ रोजी सुनावणी घेण्यात आली असता, अपीलकर्ता श्री काळे आणि जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकरी यांचेवतीने श्री जी.एम.खापरे हजर आहेत आणि सुनावणीदरम्यान उभय पक्षांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. श्री खापरे यांनी आपले प्राधिकारपत्र उत्तरासह दाखल केले. सदरील अपिलाचेबाबतीत खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

अर्जदार अपीलकर्ता श्री पुंडलिक काळे हे नियम-९ प्रमाणे, शासन राजपत्र डिसेंबर, २००९ अन्वये, त्यांना आवश्यक असलेल्या प्रकरण क्रमांक-१४४/२००३ मधील दिनांक १३ ऑक्टोबर, २००६ रोजी पारित झालेले, न्यायालयाचे आदेशाची प्रमाणित प्रत, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत प्राप्त करण्यासाठी लागणारे आवश्यक शुल्क तसेच पोस्टाचा खर्च मिळून रुपये २०/- ची रक्कम भरण्यास ते तयार असल्याचे सांगतात. सदरील रक्कम अपीलकर्ता श्री पुंडलिक काळे यांनी उच्चन्यायालय खंडपीठ, नागपूर यांचेकडे भरावी आणि त्यानुसार श्री खापरे यांनी अपीलकर्ता यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. आवश्यक असलेल्या माहितीसाठी लागणारे आवश्यक ते शुल्क भरण्यास अपीलकर्ता यांची तयारी आहे.

मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार नियम-२००

उत्तरवादी यांचेवतीने श्री खापरे यांनी सांगितले की, वरील नियम-९ मधील उद्धृत तरतूदीनुसार अपीलकर्ता श्री काळे यांनी ज्युडिशिअल प्रोसिडिंगचे आदेशाची प्रमाणित प्रत मिळण्यासाठी चॅप्टर १३ मधील नियम-३ प्रमाणेचे तरतूदीनुसार देता येईल. त्यासाठी त्यांना न्यायालयाचे दिनांक २८ फेब्रुवारी, २००७ चे पत्रानुसार तसे कळविण्यातसुध्दा आलेले आहे. तरी अर्जदार अपीलकर्ता श्री काळे यांनी आवश्यक ती वरीलप्रमाणेची रक्कम आणि तसा रीतसर अर्ज न्यायालयास पाठवावा. अपीलकर्ता श्री काळे यांनी सांगितले की, त्यांना आदेशाची सत्यप्रत नको आहे.परंतु आदेशाचे माहितीची साधी प्रत (without Attestation, without Certified)जरी प्राप्त झाली तरी चालेल. त्यानुसार अर्जदार अपीलकर्ता यांनी आवश्यक ते लागणारे शुल्क भरलेनंतर त्यांना माहितीची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी, यासाठी त्यांनी अर्ज केलेला होता. त्याप्रमाणे न्यायालयाचे खंडपिठाने अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध होण्याचेदृष्टीने त्यासाठीचे आवश्यक ते शुल्क त्यांचेकडून वसूल करुन, त्यांना आवश्यक त्या माहितीची प्रत (साधी प्रत) त्यांना उपलब्ध करुन देण्यास कांहीच हरकत नाही.

..२..

## आदेश

अर्जदार अपीलकर्ता श्री पुंडलिक काळे यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी लागणारे रुपये २०/- ची रक्कम तसेच माहिती पाठविण्यास आवश्यक असलेले, पोस्टाची तिकिटे लावलेले त्यासहचे पाकीट, रजिस्ट्रार, उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांना पाठवून, सदरील रक्कम पिठास प्राप्त झाल्यानंतर खंडपिठाने अपीलकर्ता यांना पाहिजे असलेले आदेशाची साक्षांकित प्रत पंधरा दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांचे पत्त्यावर पाठविण्यात यावी.

वरीलप्रमाणेची आवश्यक ती माहिती अपीलकर्ता याना प्राप्त होत असल्यामुळे अपीलकर्ता यांना आपले द्वितीय अपील चालवावयाचे नसल्याचे त्यांनी सांगितले व त्यांचे अपील मागे घेण्याची त्यांनी विनंती केलेली असल्यामुळे, सदरील अपील निकाली काढण्यात येते.

(भास्कर पाटील),
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
अमरावती खंडपीठ, अमरावती

Received copy of order dt. 17.1.09.
17/1/09
PIO & Dy. Regi.
H.C. Nagpur

अपीलकर्ता
17/1/09